# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक:01.09.2026** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

1. विशेष सखोल पुनरीक्षणानंतर राज्यातील प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध, 21 टक्के मतदारांची नावं वगळली.
2. भटक्या-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याची गरज असल्याचं राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचं प्रतिपादन.
3. संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीनं गणेशोत्सव साजरा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं पुणेकरांना आवाहन.
4. सेमीकॉन योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जाहीर.
5. नेपाळमधल्या पुरातील मृतांचा आकडा 903 वर.

**एस.आय.आर.**

SIR अर्थात विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अंतर्गत राज्यातल्या 288 विधानसभा मतदार संघाच्या प्रारुप मतदार याद्या काल प्रसिद्ध झाल्या. राज्याच्या प्रारुप मतदार यादीत 7 कोटी 71 लाख 65 हजार 562 मतदारांचा समावेश आहे. तर 21 टक्क्याहून अधिक म्हणजेच 2 कोटी 6 लाख 88 हजार 487 मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत. मतदार यादीत नमूद ठिकाणी अनुपस्थित राहिलेल्या, स्थलांतरित, मृत, दुबार नोंदणी असलेल्या किंवा गणना पत्र भरायला नकार दिल्यामुळं 2 कोटींहून अधिक मतदारांचा प्रारुप मतदार यादीत समावेश नाही. पुणे, ठाणे, मुंबई उपनगर, नागपूर, नाशिक या जिल्ह्यातून सर्वाधिक तर सिंधुदुर्ग, हिंगोली आणि गडचिरोलीतून सर्वात कमी मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत.

मतदार यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना आजपासून 30 सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येतील. सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर 4 नोव्हेंबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल. या प्रक्रियेदरम्यान राज्यातल्या मतदान केंद्रांचंही सुसूत्रीकरण करण्यात आलं आहे. त्यानंतर 37 मतदान केंद्र कमी झाली. मतदार कमी झाल्यानं हा बदल झाला आहे, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. याशिवाय 1 हजार 403 मतदार केंद्रांचं ठिकाण बदलण्यात आलं आहे.

**राज्यपाल**

भटक्या-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं. महाराष्ट्राची ओळख जाती पंथावरून न होता स्वप्नांवरून ठरावी अशी भावना त्यांनी व्यक्त केली. विमुक्त

जाती दिनानिमित्त पुण्यात आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात ते काल बोलत होते. या समाजातील कोणत्याही बालकाचं शिक्षण त्यांच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी असं त्यांनी यावेळी सांगितलं.

या कार्यक्रमाला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार डॉ.नीलम गोऱ्हे, भटके-विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धवराव काळ आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**भाजपा बैठक**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि विकासकामांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केलं. भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत ते काल पुण्यात बोलत होते.

देश पेट्रोल-डिझेलच्या बाबतीत परदेशांवर अवलंबून आहे, पण आगामी काळात शेतकरी आणि ईव्ही यावर पर्याय देतील असंही फडणवीस म्हणाले. देश आत्मनिर्भरतेच्या दिशेनं वाटचाल करत असताना विकसित भारताची घोडदौड रोखण्यासाठी अनेक शक्ती कार्यरत आहेत तसंच राज्यघटनेचाही गैरवापर केला जात आहे असा आरोप त्यांनी केला. या बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह राज्यातले भाजपाचे मंत्री आणि पदाधिकारी तसंच सुमारे साडेतीन हजार कार्यकर्ते उपस्थित होते.

पुणेकरांनी संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीनं गणेशोत्सव साजरा करावा असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. ते म्हणाले...

***पुण्यामध्येच ही क्षमता आहे की, संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीनं उत्सव साजरा केला पाहिजे. हे फक्त पुणेकर करू शकतात. त्यामुळे माझं पुणेकरांना आव्हान आहे की या वादात न पडता पुणेकरांनी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिलं पाहिजे की संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीनं गणेश उत्सव कसा साजरा होतो.***

**सेमिकॉन**

केंद्र सरकारनं देशातील सेमीकंडक्टर चिप निर्मिती क्षेत्रातील परिसंस्था बळकट करण्यासाठी 1 लाख 27 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'सेमिकॉन'च्या दुसऱ्या टप्प्याच्या योजनेची अधिसूचना काल जारी केली. यामुळे आगामी काळात जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठेत भारताचा वाटा जवळपास 10 टक्क्यांपर्यंत जाईल आणि जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत भारत अधिक महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे.

नवी दिल्ली इथं काल प्रसारमाध्यमांशी बोलताना केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या योजनेविषयी अधिक माहिती दिली. ते म्हणाले...

***फैब्रिकेशन में पैकेजिंग में इक्विपमेंट में मटीरियल्स में इन सब में ट्रेनिंग दी जा रही है और जिस तरह का इको सिस्टम बन रहा है, बहुत जल्दी 50,000 से 60,000 डायरेक्ट जॉब्स हर साल इसमें क्रिएट होंगे। ऑलरेडी डिजाइन में 50,000 से 60,000 डायरेक्ट जॉब्स क्रिएट हो रहे हैं। अभी मैन्युफैक्चरिंग में भी इतना लेवल का इसमें जॉब्स क्रिएट होंगे।***

## नेपाळ हानी

नेपाळमध्ये आलेल्या महापुरानंतर बचाव आणि शोधकार्य अजूनही सुरू आहे. आतापर्यंत 903 जणांचे मृतदेह सापडले असून 4,200 पेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता आहेत, अशी माहिती नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे. भारतानं नेपाळला बचाव कार्यात आणि पीडितांची ओळख पटवण्यात मदत करण्यासाठी विशेष पथकं पाठवली आहेत.

दरम्यान, 403 भारतीय नागरिक चीनमधून सुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले असून, 500 भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडे आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या 406 नागरिकांची नोंद झाली आहे. त्यापैकी 342 जणांशी संपर्क झाला असून 60 जणांशी संपर्क करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## श्रावणी सोमवार

तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त राज्यातील सर्वच प्रमुख शिवमंदिरांमध्ये काल भाविकांनी दर्शनसाठी गर्दी केली होती. नाशिकमधील त्र्यंबकेश्वर इथं तीन ते चार लाख शिवभक्त काल जमले होते. हर हर महादेवच्या घोषणांनी परीसर दुमदूमून गेला होता. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा प्राधिकरण आणि पोलिसांच्या दृष्टीनं ही रंगीत तालीम ठरली.

परळी वैजनाथ इथल्या प्रभू वैजनाथ मंदिरात तसंच बीडमधील कंकालेश्वर मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

सांगलीत श्री शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थान संस्थेनं श्रावण सोमवार निमित्त काल कावड यात्रा काढली. या कावड यात्रेत 41 नद्या आणि 21 गड किल्ल्यावरील पवित्र पाणी आणण्यात आलं होतं. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांसह पोलिस अधिकारी आणि भाविक या कावड यात्रेत सहभागी झाले होते.

## माओवाद्यांना निरोप

हिंसाचाराचा मार्ग सोडून आत्मसमर्पण केलेल्या 50 माओवाद्यांना त्यांच्या मूळ जिल्ह्यात काल सुरक्षितरित्या पाठवण्यात आलं. गडचिरोली पोलीस दलाच्या वतीनं पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या उपस्थितीत एका समारंभात त्यांना निरोप देण्यात आला. आत्मसमर्पण केलेल्या सदस्यांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक साहाय्य, शासकीय आणि कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता, रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्यविकास प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आलं. 2005 पासून आतापर्यंत अनेक जहाल माओवादी हिंसाचाराचा मार्ग सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात परतले आहेत.

**लातूर अपघात**

लातूर जिल्ह्यातील रेणापूर ग्रामीण रुग्णालयासमोर भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर प्रशासनाने रस्ते सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना न केल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने काल तहसील कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं.

**अण्णा हजारे**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रकृती अस्वस्थ असल्यानं त्यांना मुंबईतल्या बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्यावर डॉक्टर्स उपचार करत आहेत.

**नांदेड अपघात**

नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातील दीपला नाईक तांडा इथं काल झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला; तर अन्य सहा जण जखमी झाले. हे सर्वजण कैलास टेकडी आणि सहस्त्रकुंड इथं दर्शन घेऊन परत येत होते. सर्व भाविक तेलंगणा राज्यातील रहिवासी आहेत.

**हवामान**

राज्यात आज कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**